# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८

मुंबई पुणे रोड, पिंपरी, पुणे ४११ ०१८,

Website – pcmcindia.gov.in

E-mail – account@pcmcindia.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जावक क्र.लेखा/२९/कावि/ 63 /२०२४

दिनांक :- 27/05/२०२४

## परिपत्रक

विषय : सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाचे लेख्यांमधील कामकाजादरम्यान आढळलेल्या त्रुटींचे निराकरण करणेकामी उपाययोजना करणेबाबत.

मा.प्रशासक यांचे मा.महापालिका सभा ठराव क्र.५४८ दि.२०/०२/२०२४ अन्वये मंजूर केलेल्या सन २०२४-२०२५ चे मुळ अंदाजपत्रकाची अंमलबजावणी दि.०१/०४/२०२४ पासून चालू करणेत आली आहे. सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षाचे वार्षिक लेखे अंतिम करण्याचे कामकाज चालू आहे. सदर कामकाजा दरम्यान असे निदर्शनास आले आहे की. काही विभागांकडून अंदाजपत्रकामध्ये उदा. विकास कामांची अंतिम देयके अदा करणे व अपूरी तरतूद असलेल्या कामांची देयके अदा करणे अशा स्वरूपाच्या कामांचा समावेश करणेत आला असून सदर कामांच्या तरतूदींमधून ( Work key मध्ये ) इतर अनेक कामांची अंतिम देयके व अपूरी तरतूद असलेल्या कामांची देयके अदा झाल्याचे निदर्शनास आले आहे. वार्षिक लेख्यांचे काम अंतिम करताना अशा प्रकरणांमुळे जी कामे अंतिम झालेली आहेत अशा कामांवर ( Work key मध्ये ) झालेला एकुण खर्च दिसून येत नाही. त्यामुळे स्थिर मालमत्ता रजिस्टर ( Fixed Asset Register ) मधील मालमत्तांची रक्कम निश्चित करणेस अडचण निर्माण होत असून वार्षिक लेख्यांमध्ये खर्च वर्गीकरणावर परिणाम होत आहे. सदरची बाब आर्थिक स्वरूपाची असल्याने व पुर्ण झालेल्या विकास कामांचे स्थिर मालमत्ता रजिस्टर अद्यावत होणे आवश्यक असून त्याकामी उपाययोजना करणे आवश्यक आहे. मनपाचे वार्षिक लेख्यांकरीता सर्व संबंधित विभागांनी विभागस्तरावर स्थिर मालमत्ता रजिस्टर तयार करून अद्यावत ठेवणेची दक्षता घ्यावी व आवश्यक असेल त्यावेळी सदरची अद्यावत माहिती उपलब्ध करून देणेत यावी.

वार्षिक लेख्यांचे काम अचूक होणेकरीता चालू आर्थिक वर्षापासून अंतिम देयके अदा करणे व अपूरी तरतूद असलेल्या कामांची देयके अदा करणे अशा स्वरूपाच्या कामांच्या तरतूदीमधून ( Work key ) इतर कामांची अंतिम देयके व अपूरी तरतूद असलेल्या कामांची देयके खर्ची टाकणे तात्काळ बंद करणे आवश्यक आहे. विभागाने विकास कामांना तरतूदीची आवश्यकता असल्यास अंतिम देयके व अपूरी तरतूद असलेल्या कामांची देयके अदा करणे अशा स्वरूपाच्या कामांच्या तरतूदींचे मा.स्थायी समिती अथवा सक्षम समितीच्या मान्यतेने वाढ-घट करून घ्यावी.

सबब, या परिपत्रकाव्दारे सर्व संबंधित विभागांना सुचीत करणेत येते की वार्षिक लेख्यांचे काम अचूक होणेकरीता चालू आर्थिक वर्षापासून अंतिम देयके अदा करणे व अपूरी तरतूद असलेल्या कामांची देयके अदा करणे. अशा स्वरूपाच्या कामांच्या तरतूदीमधून ( Work key ) इतर कामांची अंतिम देयके व अपूरी तरतूद असलेल्या कामांची देयके खर्ची टाकू नयेत. सदर परिपत्रकाची सर्व विभागप्रमुखांनी तातडीने अंमलबजावणी करण्याची दक्षता घ्यावी.

Praveen Jain

( प्रवीण जैन )

मुख्य लेखा व वित्त अधिकारी

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी

प्रति,

सर्व संबंधित विभाग